ज्ञान प्रसारक मंडळ, येरमाळा संचलित,

# शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय
# कळंब, जि. उस्मानाबाद

# भाषा, समाज आणि समकालीन मराठी साहित्य

दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

२७ व २८ जानेवारी २०१७

Scanned with CamScanner

भाषा, समाज आणि समकालीन मराठी साहित्य
प्रथम आवृत्ती : जानेवारी २०१७

प्रकाशक :
आदित्य प्रकाशन,
लातूर

मार्गदर्शक :
प्राचार्य डॉ. अशोकराव मोहेकर

संपादक :
प्रा. डॉ. दादाराव गुंडरे

सहसंपादक :
प्रा. दीपक सूर्यवंशी
डॉ. केदार काळवणे

अक्षरजुळणी :
श्री गणेश सातपुते
कळंब (मो. ९७६६८५३२३७)

किंमत :
२००/-

ISBN : ९७८-९३-८३९०९-२६-५

*या स्मरणिकेत प्रकाशित झालेले लेख संबंधीत लेखकांचे असून त्यासाठी संपादक, सहसंपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

Scanned with CamScanner

११. चिखलवाटा : शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वास्तव चित्रण करणारी ग्रामीण कादंबरी ७०
*प्रा. संगीता दत्ताजी मोरे*
१२. समकालीन राजकीय सत्ता संघर्षाचा वेध घेणारी कादंबरी : आमदार सौभाग्यवती ७६
*प्रा. यशवंत आश्रुबा हाके*
१३. अंतरिता : एक परीक्षण ८१
*प्रा. क्षीरसागर प्रशांत ब.*
१४. समकालीन मराठी कादंबरी ८५
*प्रा. संदिप परदेशी*
१५. समकालीन ग्रामीण साहित्य ९०
*प्रा. लहूकुमार खंडाळे*
१६. समकालीन ग्रामीण कथा व समाजवास्तव एक आलेख ९६
*प्रा. जाधवर शशिकांत श्रीरंग*
१७. समकालीन मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री : एक आकलन १०६
*डॉ. शेटकार रामशेट्टी राजेंद्र व प्रा. मुदगडे जगन रघुनाथ*
१८. मराठी कवितेतील कृषी जीवन ११८
*प्रल्हाद दत्तराव भोपे*
१९. समकालीन ग्रामीण साहित्य : प्रेरणा व स्वरूप १२६
*प्रा. दीपक सूर्यवंशी*
२०. ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरूप १३२
*श्री पवार एस. जे.*
२१. मराठी ग्रामीण कादंबरीत घडणारे स्त्रीवादाचे दर्शन १३६
*श्री अविनाश ताटे*
२२. समकालीन दलित साहित्य आणि आंबेडकरवादी रंगभूमी १४२
*प्रा. डॉ. संदीप अ. बनसोडे*
२३. दलित कादंबरीचे निराळेपण १४९
*डॉ. शंकर वाघमारे*



Scanned with CamScanner

# समकालीन मराठी कादंबरी

प्रा. संदिप परदेशी
सहाय्यक प्राध्यापक
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग
बलभीम महाविद्यालय, बीड

**प्रास्ताविक :**

`समकालीन` हा शब्द काळाचा निर्देश करणारा आहे. त्या त्या विशिष्ट काळातील सामाजिक, राजकिय, आर्थिक आणि अन्य प्रकारच्या समस्या, त्यांतील ताण, त्याकाळातील विचार यांचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते. त्यामुळेच प्राचीन, अर्वाचीन आणि समकालीन अशा परंपरा साहित्यात मानल्या गेल्या. मुख्यत: १९४५ नंतरच्या साहित्याला `समकालीन साहित्य` असे नाव देण्यात आले आहे.

``समकालीन म्हणजे काळाबरोबर असणे, एकाच काळात अस्तित्वात असणे होय`` हे साहित्य आपल्या काळाशी आणि त्या काळातील परिस्थीतीशी जवळचे नाते सांगते. या काळात घडलेल्या घटनांचे पडसाद या साहित्यातून उमटतात. या काळातील माणसाच्या इच्छा, आकांक्षा, प्रयत्न, असहायता, पराभव, वेदना, विद्रोह, स्वप्ने इत्यादींचा प्रामाणिक अविष्कार साहित्यातून होतो. त्यामुळे त्याला `समकालीन साहित्य` म्हटले जाते.

१९६० नंतरचा कालखंड हा मराठी साहित्याच्या कक्षा रूंदावणारा कालखंड ठरतो. कारण या कालखंडात मराठी साहित्यात नवनवीन प्रवाह समाविष्ट झाले. या प्रवाहांनी मराठी साहित्याला समृध्द करण्याचे काम केले. १९६० ते १९८५ या


Scanned with CamScanner

कालखंडातील साहित्य हे समकालीन साहित्य ठरते. प्रस्तुत शोध निबंधात या कालखंडातील मराठी कादंबरीचा आढावा घेतला जाणार आहे.

**१९६० ते १९८५ या कालखंडातील समकालीन मराठी कादंबरी :-**

१९६० नंतरचा कालखंड हा कादंबरीचा आहे. या कालखंडात विविध प्रवाहांमधुन कादंबरीलेखन झाले. ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, या प्रवाहांमधुन मुख्यत्वे कादंबरी लेखन झालेले दिसते. प्रस्तुत शोधनिबंधातून याच प्रवाहांच्या माध्यमातून लिहिला गेलेला कादंबऱ्यांचा आढावा घेतला आहे.

**ग्रामीण जीवन चित्रण :-**

या कालखंडात प्रादेशिक वातावरण अथवा ग्रामीण परिसराचे चित्रण असलेल्या काही महत्वाच्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. वऱ्हाडातील ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण उद्धव शेळके यांच्या १९६० साक्षी प्रकाशित झालेल्या `धग` कादंबरीत येते. शेळके यांनी या कादंबरीतून माणसाच्या असह्य करणारे दाद्रिय, अज्ञान, अंधश्रध्दा, माणसाची हतबलता, अगतिकता, रूढी आणि परंपरा जपणारे मानवी मन आणि जीवनाची दुर्दम्य आसक्ती, मनुष्यात आढळणारी माणुसकी या साऱ्यांचे चित्रण अतिशय ताकदीने केले आहे.

मराठवाड्याच्या ग्रामीण बोलीसह साकार झालेली याच काळातील रा.रं. बोराडे यांची `पाचोळा` (१९७१) ही महत्वाची कादंबरी या कादंबरीतून खेड्यात जगणाऱ्या सामान्य माणसांच्या जीवनाचे चित्रण आहे. बदलत्या ग्राम जीवनातील सत्तासंघर्ष आहे.

तसेच हमीद दलवाई यांची `इंधन` (१९६४) व्यंकटेश माडगुळकर यांची वावटळ (१९६४), शंकर पाटील यांची टारफुला, आनंद यादव यांची `गोतावळा` (१९७१); उत्तम बंडु तुपे यांची `झुलवा` या काळातील महत्वाच्या ग्रामीण कादंबऱ्या आहेत.

`गोतावळा` कादंबरी आधुनिक काळात महानगरांचे यांत्रिकीकरण होऊ लागलेले होते हा एक अनुभव येत असतानाच आता हळुहळु खेड्यातही त्या यांत्रिकीकरणाची सुरूवात होऊ लागली आहे याची जाणीव करून देते. त



Scanned with CamScanner

टारफुलांमधुन खेड्यातल्या सत्तासंघर्षाच्या रूपाने आधुनिक भारतात ही सत्तेसाठी चाललेली चढाओढ व्यक्त झाली आहे.

**दलित जीवन चित्रण :-** १९६० नंतरच्या कालखंडात दलित जाणिवांचा अविष्कार करणाऱ्या काही कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. यामध्ये बाबुराव बागुल यांची `सूड (१९७०)`, केशव मेश्राम यांची `हकीकत आणि जरायू` (१९७२), नामदेव ढसाळ यांची `हाडकी हाडवळा` (१९८१), अशोक व्हटकर यांची मेलेल पाणी (१९८२), अरूण साधू यांच्या `बहिष्कृत (१९७८)` आणि त्रिशंकू (१९७९) मधु मंगेश कर्णिक यांची `भाकरी आणि फुल` इत्यादी उल्लेखनीय कादंबऱ्या आहेत.

`सूड` मध्ये `जानकी` या मुलींची करूण कहाणी आहे. तर हकीकत मध्ये दलित तरूणांच्या आयुष्याच्या आठ-दहा वर्षाची कहाणी आहे. `जटायू` मध्ये सिद्धार्थ नगरात राहणाऱ्या अंधश्रध्दा, अज्ञान आणि दारिद्रय यांनी त्रस्त माणसांचे जग आणि नव्या सुसंस्कृत जीवनाकडे झेप घेणारे अभिमनचे मन यातील द्वंद या कादंबरीत साकार झालेले आहे. `हाडकी हाडवळा` मध्ये पुर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना मिळालेल्या जमीनीच्या संघर्षाचे चित्रण आहे. `मेलेल पाणी` मध्ये चांभार जमातीच्या जीवनाचे दर्शन आढळते. `बहिष्कृत आणि त्रिशंकू` या कादंबऱ्यातून दलितांच्या प्रश्नांचे ग्रामीण आणि नागर पार्श्वभूमीवरील ज्वलंत चित्रण केलेले आहे, तर `भाकरी आणि फूल` मध्ये ग्रामीण पार्श्वभूमीवर दलित तरूणाची कुचंबणा व्यक्त झालेली आहे.

**स्त्री जीवनाचे चित्रण :**

१९६० नंतरच्या कालखंडात स्त्री जीवनाचे चित्रण करणाऱ्या काही कादंबऱ्यांमधून आधुनिक काळ, बदलती मूल्ये आणि नवी स्त्री दिसते. गौरी देशपांडे यांच्या `कारावासातून पत्रे, मध्य लटपटीत, एकेक पान गळावया`(१९८०), तेरूओ, काही दुरपर्यंत (१९८५), इत्यादी कादंबऱ्यांमधून विसाव्या शतकात ही कोणत्याही वर्जना नसलेली अशी नवी स्त्री साकार झालेली आहे. ही स्त्री आधुनिक आहे, स्वतंत्रतेकडे आणि मुक्ततेकडे तिची वाटचाल आहे. एक व्यक्ती म्हणून स्त्रीकडे पाहिले जावे, व्यक्तीच्या स्वातंत्र्याला महत्त्व दिले जावे हा विचार या कादंबऱ्यांमधून दिसतो.



Scanned with CamScanner

रोहिणी कुलकर्णी यांच्या `भेट आणि फलश्रुती`(१९८८), अंबिका सरकार ी `एका श्वासाचं अंतर, शांता गोखले यांची रीटा वेलिणकर (१९८९) या बऱ्याही स्त्री जीवन चित्रणाच्या संदर्भात उल्लेखनीय आहेत.`

**आदिवासी जीवन चित्रण :** असलेल्या काही कादंबऱ्या याच कालखंडात ध्द झाल्या. यात मधुकर वाकोडे यांची `झेलझपाट` या कादंबरीत आदिवासी कु जमातीच्या संदर्भात विविध शासकिय, अशासकिय योजना आणि त्यांचे दिवासींच्या जीवनावर पडणारे प्रभाव चित्रित केलेले आहे. तसेच सुरेश शीवार यांच `हाकुमी` या कादंबरीत माडिया गोंड या जमातीच्या जीवनाचे चित्रण हे.

**राजकिय जीवन चित्रण :** करणाऱ्या काही कादंबऱ्या या कालखंडात ाशित झालेल्या आपणाला दिसतात. यात वसंत वरखेडकर यांची `प्रतिनिधी ९७१)`, अनिल बर्वे यांची `थँक्यु मिस्टरग्लाड, अरूण साधू यांची `सिंहासन ९७७), ग.प्र. प्रधान यांची `साता उत्तराची कहाणी (१९८१) या होत. `प्रतिनिधी` ध्ये स्वातंत्र्यसानंतरच्या भारतीय लोकशाहीच्या प्रयोगाबाबत चिकित्सा केलेली ाहे. तर थँकु मिस्टर ग्लाड ही नक्षलवादी नायक असणारी मराठीतली पहिली ादंबरी ठरते. प्रतिबद्ध या कादंबरीत १९७० ते ८० या दशकाचा प्रतिनिधी असा क विनायक नावाचा मध्यमवर्गीय संवेदनाशील तरूण चित्रत केला आहे.

**ारांश :-** एकुणच १९६० नंतरच्या मराठी कादंबरीतील ठळक प्रवाहाचा विचार ापण केला. या काळात उद्धव शेळके, रणजित देसाई भालचंद्र नेमाडे, जयवंत ळवी, भाऊ पाध्ये, मधु मंगेश कर्णिक, आनंद यादव, रा.रं. बोराडे, ह.मो. मराठे, अरूण साधू, श्याम मनोहर, रंगनाथ पठारे, इ. कादंबरीकार उदयाला आले. या कालखंडात कादंबरीने मध्यमवर्गीय कक्षा ओलांडून शहरी तसेच ग्रामीण समाजाबाहेर असलेल्या जाती बहिष्कृत, समाज बहिष्कृत समुहाचे चित्रण केले आदिवासी जमातींचे चित्रण, देवदासींच्या जीवनाचे चित्रण (झुलवा : उत्तम बंडू तुपे भंडारभोग-राजन गवस)आहे. शिक्षण क्षेत्रातले राजकारण (कोसलाः भालचंद्र नेमाडे, चक्रव्यूह-रंगनाथ पठारे) इथे दिसते.



Scanned with CamScanner

शहरी राजकारणापासून ग्रामीण भागातल्या राजकारणापर्यंतचे (गांधारी - ना.धो. महानोर, वावटळ- माडगुळकर, हाल्या हाल्या दुध दे - बाबाराव मुसळे, टारफुला - शंकर पाटील) चित्रण या काळातील कादंबरी करते.

१९६० नंतरच्या कालखंडात कादंबरी लेखनाकडे गंभीरतेने पाहणाऱ्या लेखकांनी कादंबरीच्या निवेदनापासून तिच्या आशयसूत्रापर्यंत अनेक गोष्टींचा विचार केलेला आहे. सारांश रूपाने आपल्याला असे म्हणता येईल की, १९४५ ते १९६० या काळात सिमित भावविश्व असलेल्या कादंबरीहून १९६० नंतरची कादंबरी ही अधिक विकसित आणि सखोल आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. महाराष्ट्रातील प्रवाह - कादंबरी - ल.ग. जोग

२. आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - रा.श्री. जोग

३. ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास - चंद्रकुमार नलगे

४. ग्रामीणता - साहित्य आणि वास्तव - आनंद यादव

५. निळी पहाट - रा.ग. जाधव

६. स्त्री लिखित कादंबऱ्या : प्रेरणा आणि प्रवृत्ती - विद्या देवधर


Scanned with CamScanner